अ.शा. पत्र क्र. मलोआ ११२६/प्र.क्र. ११४/मलोआ

**व्ही. राधा,** भा.प्र.से.
अपर मुख्य सचिव (सेवा)

सत्यमेव जयते

**सामान्य प्रशासन विभाग**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२ - २२८८ ६१४१/२२७९ ३७६९
E-mail : acs.gadservices@maharashtra.gov.in
दिनांक : 09 JUL 2026

**विषय — महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर सादर करणेबाबत.**

प्रिय, महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२३ (२) मधील तरतुदीनुसार मा. राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आलेला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल विधानसभेच्या विद्यमान सत्रामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचा आहे.

०२. आयोगाचा वार्षिक अहवाल हा आयोगातील सर्व विभागांकडून माहिती संकलित करुन तयार करण्यात येतो. त्यानंतर सदर अहवाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मा. राज्यपालांकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतो. मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. प्रस्तुत अहवालात आयोगाचा सल्ला डावलण्याचे एकही प्रकरण नाही. मा. राज्यपालांकडून अहवाल पटलावर ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्याची मान्यता मिळाल्यानंतर सदर अहवाल मा. मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानंतर पुन्हा मा. राज्यपालांची मान्यता प्राप्त करुन अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते. या प्रक्रियेस काही कालावधी लागल्यामुळे विलंब झाला आहे.

०३. सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल मा. राज्यपाल महोदयांना सादर करण्यास तसेच विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यास दिनांक १४ मे, २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी मा. राज्यपाल महोदयांनी दिनांक २९ जून, २०२६ रोजी मान्यता दिली आहे.

०४. त्यानुसार विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी सन २०२२-२०२३ च्या वार्षिक अहवालाच्या आवश्यक प्रती व पेनड्राईव्ह सोबत सादर करण्यात येत आहेत.

आपली, स्नेहांकित,

**(व्ही. राधा)**

प्रति,

श्री. जितेंद्र भोळे,
सचिव — १, महाराष्ट्र विधानसभा,
महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.